सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
**एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,**
**E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७**

---

प्रेस नोट क्र. ०७ दि. २४.०२.२०२६

# मुरबाड बस स्टॅन्डवरील दागिन्यांच्या चोरीचा उलगडा आरोपी महिला ताब्यात
# स्थानिक गुन्हे शाखेची उत्कृष्ट कामगिरी

----------००००० ----------

दि.२१.१२.२०२४ रोजी तक्रारदार सारीखा संजय घुडे हया मुरबाड बस स्टॉप येथुन त्यांचे मुळगांवी उंबरपाडा या ठिकाणी सारखपुडाच्या कार्यक्रमाकरीता मुरबाड बस स्टॅन्ड जवळ सरगांवच्या दिशेने जाणाऱ्या बसची वाट पहात उभ्या होत्या. त्यावेळी १७:३० वा. चे सुमारास मुरबाड बस स्टॅन्ड येथे सरळगांवकडे जाणारी बस लागली तक्रारदार हया घाई-गरडबडीत गर्दीत बसमध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेवुन कोणीतरी त्यांच्या जवळील पर्सची चैन उघडुन पर्समध्ये ठेवलेल्या सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेल्याची तक्रार वरील नमुद तक्रादार यांनी समक्ष पोलीस ठाण्यात येवुन दिल्याने मुरबाड गुन्हा नोंद क्र. ३२२/२०२४ भा.न्या.सं कलम ३०३ (२) प्रमाणे दि.२१.१२.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्हयात दाखल होणाऱ्या मालमत्तेचे गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवुन मा.श्री.डॉ.डी.एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांना समांतर तपास करुन मालमत्ते संदर्भातील दाखल गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने आदेश देवुन मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे श्री.संदिप गिते,वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थागुशा यांनी अधिनस्त अधिकारी/अंमलदार यांचे वेग-वेगळी पोलीस पथक तयार करुन त्यांना सुचना देवुन मार्गदर्शन केले.

नमुद पथकाने कोणताही धागा-दोरा नसताना अथक परीश्रम घेवुन आपले गुप्त बातमीदारांच्या मदतीने तसेच तांत्रीक तपास करुन प्रस्तुत गुन्हा करणारे आरोपीतांचा शोध लावुन महिला आरोपीत लक्ष्मी किसन जाधव, रा.भांडुप मुंबई, यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्य पुर्ण तपास केला. महिला आरोपीत यांनी गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयातील **९ तोळे १.५ ग्रॅम** वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले असुन गुन्हयांचा पुढील तपास मुरबाड पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक, सोनवणे हे करीत आहे.

मा.श्री डॉ.डी.एस.स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा.श्री अनमोल मित्तल,अपर पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण,पोलीस निरीक्षक श्री संदिप गिते,यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी/महेश कदम,पोउनिरी/भाऊ गायकवाड, पोहवा/सतिष कोळी, पोहवा/हेमंत विभुते, पोहवा/गोविंद कोळी,पोहवा/रविंद्र मोरे,पोहवा/दिपक गायकवाड,मपोशि/तारवी, मपोशि/साळवे या पथकाने अथक परीश्रम घेवुन गुन्हा उघडकीस कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगीरी केलेली आहे.

************************************************************


महाराष्ट्र पोलीस
स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण
अंतर्गत
वासिंद युनिट कार्यालय


गोपनीय कक्ष
नागरिकांच्या सुलभतेकरीता पोलीस QR कोड
मुरबाड पोलिस ठाणे, मुरबाड